<u>संत तुकाराम वनग्राम योजना</u>

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक एफडीएम २००५/प्र.क्र.३१३/फ-२**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २३.११.२००६**

**वाचा :- शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२०००/प्र.क्र.१४३/ फ-२, दि.२५.४.२००६**

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार वनसंरक्षण आणि वनविकासमाध्ये स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने स्थानिक लोकांच्या सहभागाने व व्यवस्थापन करण्यासाठी एक योजना तयार करण्याबाबत राज्य शासनास सूचित केले होते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून महराष्ट्र शासनाने दिनांक २५.४.२००३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेनुसार वनक्षेत्रामध्ये व वनक्षेत्राच्या सीमेवर असणाऱ्या सुमारे १५५०० गावांपैकी आजपर्यंत ११७९९ एवढ्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

या समित्यांनी वनांचे संरक्षण करणे व अवैध वृक्षतोड, वनक्षेत्रातील अतिक्रमण, वनवणवा, अवैध चराई इत्यादींस प्रतिबंध करणे अपेक्षित आहे तसेच त्यांच्यावर त्यांचेकडे वर्ग केलेल्या वनांचे व्यवस्थापन करणे, ग्रामीण जनतेमध्ये वनांच्या महत्वाविषयी जागृति निर्माण करणे व यासारखी कामे करणे, हे सदर शासन निर्णयात विषद केल्याप्रमाणे संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे आद्य कर्तव्य आहे व त्यात सतत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून त्या समित्यांत एक चुरस निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी राज्यस्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या समित्यांना पारितोषिक जाहीर करणे शासनाच्या विचाराधीन होते.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत “राष्ट्रसंत तूकडोजी महराज स्वच्छ ग्राम स्पर्धा” अशी योजना पूर्वी पासून अंमलात आणण्यात आली आहे. त्या धर्तीवर वन विभागामध्ये एक योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये तशी घोषणाही करण्यात आली आहे त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

**शासन निर्णय :-**

“वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे” या अभंगाच्या माध्यमातून वने व वन्यजीव यांचे महत्व पटवून देणाऱ्या महान संत तुकाराम महाराज यांच्या नावाने “संत तुकाराम वनग्राम योजना” दरवर्षी राबविण्यात येईल. या योजनेंतर्गत ज्या संयुक्त वनव्यवस्थापन समित्या सहभागी होतील त्यांच्यामधून

१. जिल्हा स्तरावरील उत्कृष्ट ठरणाऱ्या गुणानुक्रमे पहिल्या ३ समित्यांना व

२. राज्यस्तरावरील उत्कृष्ट ठरणाऱ्या गुणानुक्रमे पहिल्या ३ समित्यांना,

संत तुकाराम महराजांच्या नावाने “संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट संयुक्त वनव्यवस्थापन समिती पुरस्कार” रोख स्वरुपात बक्षिसे देवून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येईल.

**योजनेची अंमलबजावणी**

**अ) योजनेस प्रसिध्दी देणे**

या योजनेची सुरवात वन २००६-०७ पासून होईल. त्यापूर्वी प्रसार माध्यमामध्ये या योजनेस व्यापक पूर्व प्रसिध्दी देण्यात येईल. तसेच क्षेत्रिय स्तरावरील वन अधिकारी/ कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना या योजने सहभागी होण्याचे आवाहन करतील. ज्या गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची अद्याप स्थापना झालेली नाही त्यांना अशी समिती स्थापन करण्यास प्रवृत्त करतील.

**ब) संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची निवड करणे**

१. वन परिक्षेत्र स्तरावरील मुल्यमापन समिती डिसेंबर महित्यात संबंधित वनक्षेत्रांना भेटी देवून संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कामाची तपासणी करुन ३ उत्कृष्ट समित्यांची नावे सदर पुरस्कारासाठी विभागीय वन अधिकाऱ्यामार्फत जिल्हा स्तरावरील निवड समितीकडे प्रस्तावित करेल.

२. वरीलप्रमाणे प्रस्तावित समित्या संबंधी आवश्यक ती तपासणी व आवश्यक असल्यास कामाची पाहणी करुन जिल्हा स्तरावर पुरस्कार देण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यातील ३ समित्यांची नावे जिल्हा स्तरावरील निवड समितीकडून जाहीर करण्यात येतील.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

३. राज्यस्तरीय मुल्यमापन समिती जिल्हास्तरावरील प्रथम बक्षीस प्राप्त समित्यांपैकी ३ समित्यांची निवड फेब्रुवारी महिन्यात पूर्ण करेल व त्यामधील प्रथम तीन समित्यांची राज्यस्तरीय बक्षिसासाठी निवड करेल.

## क) मूल्यमापन समित्यांचे गठण

वर उल्लेखित समित्यांचे गठण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**१. वनपरिक्षेत्र स्तरावरील निवड समिती :-**

१. वनक्षेत्र ज्यांच्या कार्यक्षेत्रात येते ते उप विभागीय अधिकारी (महसूल) ---- अध्यक्ष
२. सहाय्यक वनसंरक्षक संबंधित क्षेत्र ---------- उपाध्यक्ष
३. तहसिलदार
४. गट विकास अधिकारी-पंचायत समिती ------- सदस्य
५. पोलिस निरीक्षक --------- सदस्य
६. संबंधित क्षेत्राचे नजिकचे वृक्ष लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण --- सदस्य
७. तालुका कृषी अधिकारी
८. वानिकीशी निगडीत दोन सेवाभावी संस्थेचे सदस्य (वार्षिक आधारावर चक्राकार पध्दतीने) ------- सदस्य
९. सबंधित क्षेत्राचे नजिकचे वनपरिक्षेत्र अधिकारी (संबंधित वनक्षेत्र) --- सदस्य सचिव

**२. जिल्हा स्तरावरील निवड समिती :-**

१. संबंधित जिल्हाधिकारी ----- अध्यक्ष
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ---- सदस्य
३. जिल्हा पोलिस अधिक्षक---- सदस्य
४. सहसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग ----- सदस्य
५. जिल्हा अधिक्षक कृषी विभाग ---- सदस्य
६. वानिकी क्षेत्राशी निगडीत एक सेवाभावी संस्थेचे सदस्य (वार्षिक आधारावर चक्राकार पध्दतीने) ----- दोन सदस्य
७. संबंधित जिल्ह्यातील उपवनसंरक्षक (प्रा.)/उपविभागीय वन अधिकारी (योजना) ----- सदस्य सचिव

**४. राज्य स्तरावरील निवड समिती :-**

१. मा.मंत्री (वने) --------- अध्यक्ष



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

२. मा.राज्यमंत्री (वने) ----- उपाध्यक्ष
३. प्रधान सचिव (वने) ----- सदस्य
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर - सदस्य
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) महारष्ट्र राज्य नागपूर --- सदस्य
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महारष्ट्र राज्य, नागपूर ----- सदस्य
७. अशासकीय सदस्य (यांची निवड मा.मंत्री (वने) हे वार्षिक आधारावर चक्राकार पध्दतीने करतील) ----- सदस्य
८. वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन) ------ सदस्य सचिव

**ड) बक्षीस वितरण**

वरील प्रमाणे निवडण्यात आलेल्या

१. जिल्हास्तरीय बक्षीसपात्र संयुक्त वन वव्यवस्थापन समित्यांचा निकाल जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जाहीर करण्यात येईल व त्यांनतर त्याच ठिकाणी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात येईल.

२. राज्यस्तरीय बक्षीसपात्र समित्यांबाबतचा निकाल शासन स्तरावर जाहीर करण्यात येईल व समारंभपूर्वक त्यांना २१ मार्च रोजी जागतिक वन दिनाच्या कार्यक्रमामध्ये गौरविण्यात येईल.

**१.जिल्हा स्तरावरील बक्षीस समारंभ**

जिल्हा स्तरावरील गुणनुक्रमे ३ उत्कृष्ट संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वन ग्राम उत्कृष्ट जिल्हा स्तरीय संयुक्त वन व्यवस्थापन समिती पारितोषिक प्रदान करण्यात येईल पारितोषिकाची रक्कम खालीलप्रमाणे राहील

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | रु.२५,०००/- |
| द्वितीय क्रमांचे बक्षीस | रु.१५,०००/- |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | रु.७,५००/- |

**३. राज्यस्तरावरील बक्षीस समारंभ**

राज्यस्तरावरील गुणानुक्रमे ३ उत्कृष्टे संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वन ग्राम उत्कृष्ट राज्यस्तरीय संयुक्त वन व्यवस्थापन समिती पारितोषिक प्रदान करण्यात येईल पारितोषिकाची रक्कम पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | रु.१०,००,०००/- |
| द्वितीय क्रमोच बक्षीस | रु.५,००,०००/- |


PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

तृतीय क्रमांकाचे बक्षीस रु.३,००,०००/-

**फ) योजनेत सहभागी होण्याबाबतचे नियम :-**

१. ज्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्या संत तुकाराम वन ग्राम योजनेत सक्रीय सहभागी होतील त्याच समित्या निवडीस व बक्षिसांस पात्र ठरतील.

२. ज्या गावांमध्ये अद्याप संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना झालेली नाही परंतू त्या गावाची स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असल्यास योजनेची सरुवात झाल्यापासून एका महिन्याच्या आत त्या गावामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा समित्यांनी पुढील वर्षी स्पर्धेत सहभागी व्हावे.

३. बक्षिसास पात्र ठरण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीने किमान ५०% गुण मिळविणे आवश्यक राहील.

४. प्रत्येक स्तरावरील मुल्यमापन समितीने दिलेला निर्णय हा अंतिम असेल व त्याबाबत कोणत्याही स्तरावर अपील करता येणार नाही.

५. सदर योजनेचे स्वरुप, वेळापत्रक, सहभागी होण्याच्या अटी व शर्ती, बक्षीसांच्या रकमा, इत्यादी मध्ये वेळोवेळी बदल/सुधारणा करण्याचे अधिकार शासनास असतील.

६. संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या कार्याचे मुल्यमापन ज्या बाबींच्या आधारे करावयाचे आहे त्याचा व त्यासाठी द्यावयाचे गुण याचा तपशिल सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आला आहे.

७. बक्षीस प्राप्त समित्या पुढील वर्षी वरील स्तरावरील स्पर्धेत भाग घेवू शकतील परंतू राज्यस्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त समिती पुढील ५ वर्षे स्पर्धेत सहभागी होवू शकणार नाही.

८. प्रथम फेरीत बक्षीस प्राप्त झालेली संयुक्त वन व्यवस्थापन समिती जर पुढील फेरीतील बक्षीसास पात्र ठरली तर प्रथम प्राप्त बक्षीसाची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम देण्यात येईल.

**ग) बक्षीस रकमेचा विनियोग :-**

समितीस प्राप्त होणाऱ्या बक्षीसांची रक्कम ही समितीच्या नावे अस्तीत्वात असलेल्या बचत खात्यात जमा करण्यात येईल आणि तिचा उपयोग मंजूर सुक्ष्म योजनेनुसार वन विकास कामासाठी केला जाईल.

या योजनेबाबत होणारा खर्च ,महसूल व वन विभाग मागणी क्र.सी.-७ २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१, वनसंधारण व विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

(११) (१०) ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (२४०६ १५२१) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-२८३/०६/व्यय-१०, दिनांक १३.११.२००६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

(म.द.जाधव)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति -

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) सर्व मा.मंत्री, मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६) महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अ.मु.स./प्रधान सचिव/सिचव
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
११) मुख्य वनसरक्षक/वनसंरक्षक (सर्व)
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय
१४) सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय
१५) जिल्हाधिकारी (सर्व)
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
१७) पोलिस अधिक्षक (सर्व)
१८) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१९) उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (सर्व) (त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायाप्रती यांच्या कार्यक्षेत्रातील संयुक्त वनव्यवस्थापन समित्या/ ग्रामपंचायती यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात)
२०) उपविभागीय अधिकारी (महसूल) सर्व
२१) जिल्हा विकास अधिकारी(सर्व), जिल्हा कृषि अधिकारी/मृदसंधारण अधिकारी (सर्व)
२२) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
२३) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

## संत तुकाराम वनग्राम अभियान योजनेसाठी मूल्यांकन प्रपत्र

संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे नांव :-

वनविभागाचे नांव :-

| अ.क्र. | कसोटीचे नाव | कमाल गुण | श्रेणीकरीता समर्थन | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १ | वनीकरण | १० | | |
| २ | मृद व जलसंधारण | १० | | |
| ३ | वनसंरक्षण | १० | | |
| ४ | वन वणवा प्रतिबंध उपाय | ५ | | |
| ५ | वनक्षेत्रावरील अतिक्रमणास प्रतिबंध | ५ | | |
| ६ | वनांमध्ये अवैध चराईस प्रतिबंध | ५ | | |
| ७ | वन्य पशू पक्षी संरक्षण | ५ | | |
| ८ | वन्य प्राणी/पक्षी यांना पाणवठा उपलब्ध करुन देणे | ५ | | |
| ९ | श्रमदान | ५ | | |
| १० | कार्यक्रमामधील जनतेचा सहभाग | ५ | | |
| ११ | स्त्रियांचा सहभाग | ५ | | |
| १२ | वनेतर पर्यायी इंधनाचा वापर | ५ | | |
| १३ | निधीचा विनियोग | ५ | | |
| १४ | अभिलेख (रेकॉर्ड ठेवणे) | ५ | | |
| १५ | नवसंकल्पना | ५ | | |
| १६ | जनजागृती | ५ | | |
| १७ | विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती | ५ | | |
| | एकूण | १०० | | |

* वरील श्रेणीशिवाय मूल्यांकन अधिकाऱ्यांने सुमारे १० ओळीत साध्याबाबत वर्णनात्मक खुलासा करावा.



PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com